● वर्ष : ०३ ● अंक : ०५३ ● पुणे ● बुधवार, दि. ०५ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



# निवडणुकांचा धुरळा

विशेष वृत्त : प्रतिक गंगणे

**● ०७ नोव्हेंबर**
मतदारसंघनिहाय मतदारयाद्या आयोगाकडून प्रसिद्ध होतील

**● १० नोव्हेंबर**
पासून उमेदवारांना आपापले उमेदवारी अर्ज दाखल करता येणार

**● १७ नोव्हेंबर**
उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत, अर्ज छाननी १८ नोव्हेंबरला

**● २१ नोव्हेंबर**
अपील नसलेल्या ठिकाणी उमेदवारी अर्ज माघारीची अंतिम मुदत

**● २५ नोव्हेंबर**
अपील असलेल्या ठिकाणी उमेदवारी अर्ज माघारीची अंतिम मुदत

**● २६ नोव्हेंबर**
निवडणूक चिन्ह वाटप व अंतिम उमेदवार यादी जाहीर

**● ०२ डिसेंबर**
मतदान

**● ०३ डिसेंबर**
निकाल

## हे लक्षात ठेवा

- निवडणूक होत असलेल्या नगरपालिका : २४६
- नगर पंचायती : ४२
- मतदान : २ डिसेंबर
- मतमोजणी : ३ डिसेंबर
- उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत : १० ते १७ नोव्हेंबर
- छाननी : १८ नोव्हेंबर
- एकूण मतदार : १ कोटी ०७ लाख, ३ हजार, ५७६
- पुरुष मतदार : ५३ लाख, ७९ हजार, ९३१
- महिला मतदार : ५३ लाख, २२ हजार, ८७०
- इतर मतदार : ७७५
- मतदान केंद्रे : १३,३५५

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

करोना साथरोगापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पहिल्या टप्प्यातील निवडणुकांचा कार्यक्रम सर्वोच्च न्यायालयाच्या दट्ट्यामुळे अखेर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला. राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींची निवडणूक २ डिसेंबरला होणार आहेत. मतदारयाद्यांमधील घोळावरून महाविकास आघाडी आणि मनसेने राळ उठविल्यानेच दुबार मतदारांना रोखण्याचे निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपूर्वी राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश दिला होता. यानुसार पहिल्या टप्प्यात २८८ नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. २ डिसेंबरला मतदान तर दुसऱ्या दिवशी म्हणजे ३ तारखेला मतमोजणी होणार आहे. एकूण ६,८५९ जागांसाठी मतदान होईल.

नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या नगराध्यक्षपदाची थेट निवडणूक असल्याने २८८ नगराध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे. नगरपालिकांसाठी दोन सदस्यीय प्रभाग पद्धत आहे. काही ठिकाणी एका प्रभागात तीन सदस्य निवडून येतील. नगर पंचायतींमध्ये एक सदस्यीय प्रभाग आहेत. सुमारे एक कोटी मतदारांना दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा मतदान यंत्राची कळ दाबावी लागणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले. दुसऱ्या टप्प्यात डिसेंबरअखेर जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती तर १५ जानेवारीच्या आसपास मुंबईसह २९ महानगरपालिकांची निवडणूक होण्याची शक्यता आहे. मतदारयाद्यांमधील घोळावरून महाविकास आघाडी आणि मनसेने आक्रमक भूमिका घेतली आहे. मतदारयाद्यांमध्ये सुधारणा झाल्यावरच निवडणुका घेण्याची मागणी विरोधकांनी केली होती. पण विरोधकांची ही मागणी राज्य निवडणूक आयोगाने फेटाळून लावली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक प्रक्रिया पार पाडावी लागेल, असे वाघमारे यांनी सांगितले.

राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले, निवडणूक आयोगाने दुबार मतदारांचा प्रश्न सोडवण्यासाठी एक टूल तयार केले आहे. त्यानुसार, ज्या मतदारांची दुबार नावे आहेत, त्या ठिकाणी दोन स्टार्स असतील. या मतदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जाईल. त्या मतदाराला त्याला कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करायचे आहे हे विचारले जाईल. त्यानंतर त्यांनी पसंती दर्शवलेल्या मतदान केंद्रावर त्यांना मतदान करता येईल. अशा प्रकारे दुबार मतदारांना एकाच मतदान केंद्रावर मतदान करता येईल, अशी माहिती वाघमारे यांनी दिली आहे. तसेच संबंधित मतदाराने काहीही संपर्क केला नाही, तर सगळ्या मतदान केंद्रावर डबल स्टार मतदार अशी नोंद केली जाईल. त्यानंतर हा मतदार मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी आला तर त्याच्याकडून मी दुसऱ्या कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करणार नाही किंवा केले नाही असे प्रतिज्ञापत्र घेतले जाईल, असेही निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. आयुक्तांनी दुबार मतदारांच्या प्रश्नी उत्तर दिल्यानंतर उपस्थित पत्रकाराने प्रश्न केला की लोकसभा आणि विधानसभेत दुबार मतदान झाले आहे हे तुम्ही मान्य करता का? यावर आयुक्तांनी उत्तर देणे टाळले. लोकसभा आणि विधानसभेवर मी काही बोलणार नाही, असे त्यांनी उत्तर दिले. त्यानंतर उत्तर भारतीय विकास सेनेच्या नेत्याने मध्येच निवडणूक चिन्हाचा प्रश्न उपस्थित केला. यावेळी पत्रकारांनी ही पत्रकार परिषद असून तुम्ही पत्रकार नसल्याचे म्हणत त्यांना खाली बसवले. मतदारांचा सध्या रोष आहे, त्यांची नावे गाळली आहेत किंवा दुबार आलेली आहेत, अशा कठीण प्रसंगी तुम्ही सर्वोच्च न्यायालयाला ही निवडणूक आणखी पुढे ढकलावी अशी मागणी का केली नाही? असा सवाल यावेळी पत्रकाराने उपस्थित केला. यावर बोलताना आयुक्त म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने 31 जानेवारी 2026 च्या सर्व निवडणुका घेण्याचा आदेश दिला आहे.

नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मोठ्याप्रमाणावर मतदार जागृती करण्याचे आदेश संबंधित सर्व जिल्हाधिकारी आणि नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत. पारंपरिक प्रसारमाध्यमांबरोबरच नवीन माध्यमांचा कौशल्यापूर्ण वापर करण्याबाबत आयोगाने 12 जून 2025 रोजी पत्राद्वारे सर्वांना निर्देश दिले आहेत. मतदार जागृतीसंदर्भातील सर्व सूचना व निर्देश मार्गदर्शक स्वरुपात असून, स्थानिक पातळीवर काही नावीन्यपूर्ण उपक्रम सूचल्यास तेही आपापल्यास्तरावर राबविण्याबाबत कळविले आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

## दुबार नावे असलेल्या मतदारांची पडताळणी




## महापालिकेला आचारसंहिता नाही

राज्यातील २४६ नगरपालिका, ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी मंगळवारी दुपारनंतर आचारसंहिता लागू झाली आहे. परंतु, ही आचारसंहिता पुणे महापालिकेला लागू होणार नाही, असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे पुणे महापालिकेतील अनेक नवीन कामे होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतींची निवडणुकीची घोषणा झाल्यापासून आचारसंहिता लागू झाली आहे. २ डिसेंबरला मतदान आणि मतमोजणी ३ डिसेंबरला होणार आहे. या निवडणुकीची आचारसंहिता पुणे महापालिकेला लागू होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

## १ जुलैचीच मतदार यादी ग्राह्य

नगरपालिका निवडणुकीसाठी १ जुलै २०१५ ची मतदारयादी ग्राह्य मानली जाईल. १५ ऑक्टोबरची यादी वापरण्यास मिळावी, अशी केंद्रीय निवडणूक आयोगाला विनंती करण्यात आली होती. पण निवडणूक आयोगाकडून काहीच प्रतिसाद अद्याप मिळालेला नसल्याचे राज्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले. बहुसदस्यीय निवडणूक असल्याने व्हीव्हीपॅटचा वापर करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होणार नाही.

## तळपायाची आग मस्तकात गेली : राज ठाकरे



राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात माहिती दिली. तसेच दुबार मतदार दुबार मतदारांचा प्रश्न सोडवण्यासाठी एक टूल तयार केले आहे. त्यानुसार, ज्या मतदारांची दुबार नावे आहेत, त्या ठिकाणी दोन स्टार्स असतील, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे. निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरेंनी टीका केली आहे. राज ठाकरे यांनी ट्विट करत म्हटले, आजच्या निवडणुका आयोगाच्या पत्रकार परिषदेची क्लिप मला कोणीतरी पाठवली. ती पाहून तळपायाची आग मस्तकात गेली! आणि आता 100 टक्के खात्री पटली की निवडणूक आयोग स्वायत्त आहे हे फक्त संविधानात आहे. हे सत्ताधाऱ्यांच्या हातचं बाहुलं आहे, अशी टीका त्यांनी केली आहे. दुबार मतदार नोंदणीपासून, ते मतदार यादीतील अनेक घोळ या सगळ्यावर एकही प्रश्न विचारल्यावर जर निवडणूक आयोगाला एकही उत्तर देता येत नसेल किंवा द्यायची इच्छा नसेल तर तुमचा उपयोग काय? जबाबदारी तर तुम्ही केंव्हाच झटकली आहेत, आत्ता उत्तरदायित्व पण नाकारणार, मग तुमच्या पदांच करायचं काय? असा संतप्त सवाल राज ठाकरेंनी केला आहे.

# निवडणूक आयोगाच्या निर्णयावर मी समाधानी नाही

## निवडणुका उशिरा घेतल्या तर काय बिघडले असते? आमदार संजय गायकवाड यांचा सवाल

**बुलढाणा(दै. आरंभ पर्व)**

राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत आगामी स्थानी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात माहिती दिली आहे. तसेच दुबार मतदार प्रश्नी देखील एक टूल तयार केले असल्याची निवडणूक आयुक्तांनी सांगितले आहे. परंतु, यावर देखील विरोधकांनी आक्षेप घेतला आहे. विशेष बाब म्हणजे निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेवर शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी दुबार मतदारांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयावर मी समाधानी नसल्याचे म्हटले आहे.

संजय गायकवाड म्हणाले, निवडणूक आयोगाने निवडणुका जाहीर केल्या आहेत मात्र, दुबार मतदारांच्या बाबतीत



घेतलेल्या निर्णयावर मी समाधानी नाही. एकट्या बुलढाण्यात हजारो मतदारांची नावे दुबार आहेत, तर राज्यातील लाखो मतदारांकडून निवडणूक आयोग हमीपत्र घेणार आहे का? असा सवाल गायकवाड यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना संजय गायकवाड म्हणाले, दुबार मतदारांची नावे डिलीट केली असती तर बरे झाले असते आणि 10 दिवस निवडणुका उशिरा घेतल्या तर काय बिघडले असते? निवडणूक आयोगाच्या निर्णयावर मी समाधानी नाही. तसेच राज्यात महायुतीबाबत अद्यापही निर्णय झालेला नाही. जो चांगले काम करेल तो निवडणूक जिंकेल असेही गायकवाड म्हणाले.

दरम्यान, सध्या राज ठाकरे हे महाविकास आघाडीकडे वळताना दिसत आहेत. त्यांनी काढलेल्या मोर्चामध्ये महाविकास आघाडीचे सर्वच नेते उपस्थित होते. यावर प्रतिक्रिया देताना संजय गायकवाड म्हणाले, राज ठाकरे महाविकास आघाडीत आले तरी ग्रामीण भागात त्यांचा प्रभाव पडणार नाही. मात्र, मुंबई पुण्याकडे थोडाफार फायदा राज ठाकरेंमुळे महाविकास आघाडीला होऊ शकतो, असे गायकवाड म्हणाले.

## निवडणूक आयोग मालकाच्या सांगण्याप्रमाणे वागतंय - अनिल परब

अनिल परब म्हणाले, ते म्हणतात की दुबार मतदारांच्या नावावर स्टार करणार. स्टार करणार म्हणजे काय, त्या माणसाला विचारणार, आता ही माणसे यांना सापडणार कशी? याची प्रोसेस काय हे कोणालाही माहित नाही. कशा पद्धतीने याला रोखणार, याचे काहीच उत्तर नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाने काम पुढे रेटण्याचे काम केले आहे. या निवडणूक आयोगाचे जे मालक आहेत, भारतीय जनता पक्ष हे त्यांचा अजेंडा ठरल्याप्रमाणे राबवतील. हे फक्त लोकांच्या डोळ्याला पाणी लावण्याचे काम करत आहेत, की आम्ही अशी कारवाई करू, ते करू. मुळात कोणतीही कारवाई ते करणार नाही. वाचा सविस्तर

# भाविकांची चेंगराचेंगरी

तीन दिवसांपूर्वी आंध्र प्रदेशमधील श्रीकाकुलम जिल्ह्यात व्यंकटेश्वर मंदिरात एकादशीच्या पूजेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत १२ भाविकांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेचे कारण अरुंद प्रवेशद्वार, बांधकाम चालू असलेला परिसर आणि प्रशासकीय हलगर्जीपणा असल्याचे मानले जात आहे. देव मंदिरात बाराही महिने असतो. तो कुठेही जात नाही. भक्त कधीही ये-जा करू शकतात, देव 'भक्तीचा भुकेला' असतो, अशी ही कल्पना आहे. तरीही यात्रा, एकादशी, तिथीला मंदिरांमध्ये भक्तांची प्रचंड गर्दी होत असते. या गर्दीवर नियंत्रण मिळविताना कोणत्याही भागातील प्रशासनावर मर्यादा पडणे स्वाभाविकच असते. उपलब्ध जागेच्या क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाली, की चेंगराचेंगरी होणे स्वाभाविकच आहे. त्यातून अफवा, पुढे जाण्याची घाई, गर्दीमुळे निर्माण झालेला उकाडा, श्वास घेण्यासाठी होणारा त्रास व त्यातून पळापळ प्रसंगी एकमेकांना अक्षरश: तुडवतच गर्दी मार्गक्रमण करत असते. त्यातून मृत्यूकांड होते. काही काळ हळहळ व्यक्त केली जाते. चर्चांना उधाण येते, काही दिवसांनी पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' अशी स्थिती त्या ठिकाणी पाहावयास मिळते.

ऑगस्ट २००३ मध्ये नाशिकच्या कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ यात्रेकरूंचा मृत्यू झाला होता. म्हणजे या घटना दक्षिण अथवा उत्तर भारतात घडतात, अशातला भाग नाही. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात २००५ साली मांढरदेवी येथील काळुबाई देवस्थानाच्या ठिकाणीही अशा प्रकारची चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली होती. त्या दुर्घटनेत तर जवळपास ३०० हून अधिक लोकांचा मृत्यू तर २५० हून अधिक लोक गंभीर जखमी झाले होते. दरवर्षी शाकंभरी पौर्णिमा मेळ्यानिमित्त काळुबाई मंदिरात लाखो भाविक जमतात. त्यावर्षी देवीला नारळ आणि बकरे अर्पण करण्यासाठी जवळजवळ दोन लाख लोक जमले होते, कोणीही अशा प्रकारची दुर्घटना घडावी अशी इच्छा केली नसती. मंदिरात फक्त स्टॉलने वेढलेल्या एका अरुंद गल्लीतून प्रवेश करता येतो. दुपारनंतर सुरू झालेल्या चेंगराचेंगरीमुळे, आतील गर्भगृहात जाणाऱ्या पायऱ्यांवर साचलेले नारळपाणी आणि दिव्याचे तेल निसरडे झाले. काही महिला पाय घसरून पडल्या आणि त्या तुडवल्या गेल्या. वरच्या विजेच्या तारा तुटल्या, ज्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली. इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीनंतर एलपीजी सिलिंडरचा स्फोट झाल्याने चेंगराचेंगरी झाली.

परवाच्या व्यंकटेश्वर मंदिरातील दुर्घटनेचा आढावा घेतला असता, त्या घटनेतही अन्य घटनांच्या तुलनेत फारसे वेगळे काही दिसत नाही. व्यंकटेश्वर मंदिरात एकादशीच्या पूजेनिमित्त मंदिरात मोठ्या



संख्येने भाविक जमा झाले होते. मंदिरात प्रवेश करण्याची व मंदिरातून बाहेर पडण्याची जागा अरुंद असून मंदिर परिसरात बांधकाम सुरू असल्याने ही दुर्घटना घडली. मंदिर संकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दी वाढली, ज्यामुळे भाविकांमध्ये घबराट निर्माण झाली आणि चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण झाली. एकादशी हा हिंदू धर्मातील एक अत्यंत पवित्र दिवस आहे. याच पवित्र दिवशी व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात हजारो भाविक दर्शनासाठी जमले होते. मात्र, पोलीस आणि मंदिर प्रशासनाकडून गर्दीवर नियंत्रण मिळवता आले नाही. त्यामुळे चेंगराचेंगरी होऊन भाविकांना आपला जीव गमावला. व्यंकटेश्वर मंदिरातील दुर्घटनेमुळे दक्षिण भारताला हादरा बसला असून अलीकडच्या काळात चेंगराचेंगरी, त्यातून घडणाऱ्या दुर्घटना आणि मृत्यूचे तांडव या घटना ठरावीक अंतरानी घडतच चालल्या आहेत.

व्यंकटेश्वर मंदिरात झालेली चेंगराचेंगरीची घटना या वर्षातील आंध्र प्रदेश राज्यातील तिसरी घटना आहे. ३० एप्रिल रोजी विशाखापट्टणम येथील सिंहचलम मंदिरात पावसामुळे भिंत कोसळून सात जणांचा मृत्यू झाला होता. ८ जानेवारी रोजी आंध्र प्रदेशातील तिरुपती येथे तिरुमला येथील भगवान वेंकटेश्वर मंदिराच्या विशेष दर्शनासाठी तिकिटे वाटप करण्यासाठी काउंटवर झालेल्या गर्दीत चेंगराचेंगरी होऊन सहा जणांचा मृत्यू झाला होता. काही दिवसांपूर्वीच शेजारच्या तामिळनाडू राज्यात अभिनेता आणि आता राजकीय पक्षाचा नेता झालेल्या थलपती विजयच्या रॅलीत चेंगराचेंगरी होऊन ४१ लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर काही दिवसांनीच आता आंध्रात ही दुःखद घटना घडली आहे. इंडियन प्रीमियर लीग'चे (आयपीएल) जेतेपद पटकावल्यानंतर जून महिन्यात 'आरसीबी' संघातील खेळाडूंच्या विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनने चिन्नास्वामी क्रीडांगणात केले होते. या वेळी क्रीडांगणाबाहेर चाहत्यांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. यादरम्यान चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला आणि ५६ जण जखमी झाले. दिल्लीतील रेल्वे स्थानकावरही चेंगराचेंगरी झाल्याची घटना घडली होती, ज्यात अनेकजण जखमी झाले होते. नवी दिल्ली येथील रेल्वेस्थानकावर १५ फेब्रुवारी २०२५च्या रात्री झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण घायाळ झाले आहेत.

महाकुंभाला जाण्यासाठी हिंदू भाविकांमध्ये नेहमीच उत्सुकता असते. त्यामुळे प्रयागराजसह बिहार, उत्तर प्रदेशातील स्थानके आणि आता नवी दिल्ली येथे फलाटांवर गर्दी ओसंडून वाहत आहे. गर्दीचे नियंत्रण करणे कोणत्याही प्रशासनाला सध्या शक्य होत नाही, असे लक्षात येते. चेंगराचेंगरीमुळे मृत्यूचे होणारे तांडव अलीकडच्या काळात ठरावीक कालावधीनंतर घडतच आहे. अशा घटनांना आळा बसणे आवश्यक आहे. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाल्यावर दुर्घटना होणे स्वाभाविकच आहे. अशा घटनांना आवर घालणे काळाची गरज आहे. कोणतेही प्रशासन गर्दीला नियंत्रणात आणू शकत नाही. त्यामुळे लोकांनीच गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळले तरच अशा घटनांना पूर्णविराम बसेल. महाराष्ट्रातील पंढरपूरात तर आषाढीचा भाविकांचा महापूर लोटतो. विठूरायाच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूरात येतात. पण सर्व काही शिस्तबद्ध असते. चंद्रभागेच्या पात्रात स्नानासाठी लाखो भाविक एकाचवेळी असतात.

भाविक रांगेत दर्शन घेतात. पण तिथे चेंगराचेंगरी नसते. लाखो भाविक येऊन विठूरायाच्या पंढरीत चेंगराचेंगरी होत नाही, याचे इतर ठिकाणी गर्दी करणाऱ्या भाविकांनी अनुकरण करणे आवश्यक आहे.

# फ्लिपकार्टकडून भारतातील नवीन व्यापार मार्गांना चालना

## उद्योजकांना सक्षम बनवून आणि समावेशक वाढीला प्रेरणा

**फ्लिपकार्ट आपल्या विक्रेता परिसंस्थेला बळकटी देत आहे आणि तंत्रज्ञानावर आधारित नवसंशोधनात गुंतवणूक करत आहे. ते भारताला सक्षम बनवण्याच्या आणि भारतातील समावेशक डिजिटल कॉमर्सचे भविष्य घडवण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनावर ठाम आहे.**

**बंगळुरू (दै. आरंभ पर्व)**

भारतातील देशांतर्गत ई-वाणिज्य बाजारपेठ फ्लिपकार्टमुळे देशातील डिजिटल कॉमर्स क्षेत्रात एक शक्तिशाली परिवर्तन दिसते आहे कारण सुरत आणि भिवंडी ते जयपूर आणि करनाल अशी नवीन प्रादेशिक व्यापार केंद्रे या प्लॅटफॉर्मवर उदयास आणि भरभराटीला येत आहेत. उत्सवाच्या हंगामात या प्रचंड-वाढीच्या क्लस्टर्समधून नवीन निवडींमध्ये १.४ पट वाढ दिसून आली आहे, फ्लिपकार्ट टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील उद्योजकांना शाश्वत, तंत्रज्ञानावर आधारित व्यवसाय वाढवण्यास आणि भारताच्या वाणिज्य यशोगाथेला नवीन क्षितिजे पादाक्रांत करण्यास सक्षम करत आहे.

टियर-२ शहरांपैकी भुवनेश्वर, भिवंडी आणि दुर्गापूरमध्ये उत्सवाच्या हंगामात जास्तीत जास्त वाढ दिसून आली. ती प्रादेशिक भारतातील वाढत्या डिजिटल सहभागाचे अधोरेखित करते. ही वाढ भारतातील उद्योजक तंत्रज्ञानावर आधारित व्यवसाय कशा प्रकारे वाढवतात आणि ऑनलाइन कॉमर्सद्वारे शाश्वत वाढ कशी करतात हे प्रतिबिंबित करते. मेरठ आणि लखनौ व्यापार केंद्रांची पुढची लाट म्हणून उदयास येत आहेत आणि कन्नौज आणि शांतीपूरसारख्या पूर्वीच्या केंद्रांच्या यशाचे प्रतिबिंब आहेत. विक्रेत्यांना व्यवहार आणि एकूण विक्री दोन्हीमध्ये सातत्यपूर्ण वाढ दिसून येते.

उत्सवांसाठी खरेदीच्या लाटेत फ्लिपकार्टमध्ये ऑटोमोबाईल, टीव्ही, स्पोर्ट्स शूज आणि मेकअप आणि सुगंध अशा काही श्रेणींमध्ये वाढ दिसून आली, जी ग्राहकांच्या आवडीनिवडींमध्ये बदल आणि बाजारपेठेत सखोल प्रवेश दर्शवते. नवीन वाणिज्य केंद्र आणि बदलत्या खरेदी वर्तनामुळे फ्लिपकार्टच्या वाढीच्या कथेला चालना मिळत आहे आणि स्थानिक विक्रेते राष्ट्रीय मागणीशी कसे जोडले जातात हे पुन्हा एकदा दिसून येत आहे.

फ्लिपकार्टचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि मार्केटप्लेस प्रमुख साकेत चौधरी म्हणाले, "भारतातील नवीन व्यापार केंद्रे, मग ती सुरत, मेरठ किंवा लखनऊ असोत, ती आता ई-वाणिज्यचा वाढीत भर घालत आहेत. डिजिटल साधने, डेटा आणि पारदर्शक प्रक्रिया स्थानिक उद्योजकांना वेगाने वाढण्यास कसे सक्षम बनवू शकतात याचे हे प्रदेश उदाहरण देतात. रिअल-टाइम बिझनेस माहिती देणारे अंतर्ज्ञानी सेलर डॅशबोर्ड आणि किंमत आणि मागणीवर डेटा मार्गदर्शन देणारे एआय-संचालित नेक्स्ट इनसाइट्स प्लॅटफॉर्म्ससह आम्ही विक्रेत्यांना अधिक स्मार्ट, अधिक माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करत आहोत. फ्लिपकार्टमध्ये आम्ही हे परिवर्तन शक्य करण्यासाठी वचनबद्ध आहोत आणि ई-कॉमर्सला समावेशक आणि शाश्वत वाढीसाठी एक प्लॅटफॉर्म बनवत आहोत."

तंत्रज्ञानावर आधारित या गतीनुसार फ्लिपकार्ट एमएसएमई, कारागीर आणि पहिल्यांदाच येणाऱ्या उद्योजकांना त्यांचे व्यवसाय अधिक वेगाने आणि दूरदृष्टीने चालवण्यास सक्षम करत आहे. विक्री प्रवास सुलभ करून आणि कार्यान्वयनातील जटिलता कमी करून हा प्लॅटफॉर्म देशभरातील विक्रेत्यांना ऑनलाइन मार्केटप्लेसमध्ये शाश्वतपणे आणि आत्मविश्वासाने वाढण्यास सक्षम करतो. तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि प्रशिक्षणातील सततच्या गुंतवणुकीद्वारे फ्लिपकार्ट ई-कॉमर्सचे लोकशाहीकरण करण्याच्या आणि भारतातील लाखो लघु आणि मध्यम व्यवसायांना भारताच्या डिजिटल विकासाच्या कथेत सहभागी होण्यास मदत करण्याच्या आपल्या वचनबद्धतेला बळकटी देत आहे.

व्यवसाय सुलभतेसाठीच्या या वचनबद्धतेला पुढे नेत फ्लिपकार्टने ऑटोमॅटिक डॅशबोर्ड अपडेट्स, सुधारित स्लॅब्सवर सक्रिय संवाद आणि समर्पित प्रशिक्षण सत्रांद्वारे आपल्या विक्रेता समुदायासाठी जीएसटी अनुपालन सोपे केले आहे. या प्रयत्नांमुळे विक्रेत्यांना २०० कोटींहून अधिक जीएसटी फायदे ग्राहकांना अखंडपणे देण्यास सक्षम केले आहे,. त्यामुळे पारदर्शकता, अनुपालन आणि सर्वसमावेशक वाढीवर फ्लिपकार्टचे लक्ष अधिक वाढले आहे.

# मानाजी नगर वाहतूक कोंडीवर खेडेकर यांचा थेट पुढाकार!

**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

मानाजी नगर चौक परिसरात गेल्या काही दिवसांपासून वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. सकाळ-संध्याकाळी ऑफिसला जाणारे कर्मचारी, शाळकरी मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांना या कोंडीत अडकावे लागत होते. या गंभीर समस्येची दखल घेत माजी. आदर्श सरपंच पोपटराव नानासाहेब खेडेकर यांनी स्वतः रस्त्यावर उतरून वाहतुकीचे नियोजन करून दाखवले.

खेडेकर यांनी पोलिस विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. चौकात असलेल्या वाहनांच्या अयोग्य पार्किंगमुळे होणारी अडचण, बसथांब्याजवळील गर्दी, तसेच सिग्नलचे समन्वय याबाबत त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी त्यांनी नागरिकांशीही संवाद साधून त्यांच्या



अडचणी जाणून घेतल्या. खेडेकर म्हणाले, "मानाजी नगर चौक हा नऱ्हे परिसराचा महत्त्वाचा वाहतूक बिंदू आहे. नागरिकांचा त्रास कमी व्हावा म्हणून तातडीने उपाययोजना केली जात आहे. भविष्यात पुन्हा अशी कोंडी होऊ नये यासाठी लवकरच मी अधिकृत निवेदन सादर करणार आहे." या कृतीशील आणि जबाबदार भूमिकेमुळे नागरिकांनी खेडेकर यांचे कौतुक केले आहे.

# भव्य आधार कार्ड शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरात युवा सेना शहराध्यक्ष निलेशभाऊ गिरमे आणि त्यांच्या मातोश्री राधिकाताई गिरमे यांच्या पुढाकाराने शिवसेना युवासेना व संकल्प प्रतिष्ठान यांच्या वतीने "शासन आपल्या दारी – भव्य आधार कार्ड शिबिर" आयोजित करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व आधारसंबंधी सेवा उपलब्ध करून देणे हा होता. शिबिरात नवीन आधार नोंदणी, पत्ता दुरुस्ती, मोबाईल लिंकिंग, बायोमेट्रिक अपडेट अशा सर्व सेवा मोफत देण्यात आल्या. पाच मशीनद्वारे जलद आणि सुटसुटीत सेवा दिल्याने नागरिकांना मोठी सोय झाली. शिबिराला लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील लोकांनी हजेरी लावली. दिवसभरात शेकडो नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. अनेकांनी सांगितले की, "अशा शिबिरांमुळे सरकारी सेवा




थेट आपल्या दारी मिळतात. वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठी बचत होते." या यशस्वी आयोजनाबद्दल परिसरातील नागरिकांनी शिवसेना शहराध्यक्ष निलेशभाऊ गिरमे व मातोश्री राधिकाताई गिरमे यांचे मनापासून कौतुक केले. त्यांच्या पुढाकाराने नागरिकांच्या दारी सरकारी सेवा पोहोचल्याने समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या भव्य शिबिरामुळे धायरी परिसरात शिवसेनेच्या जनसेवेची छाप अधिक दृढ झाली असून नागरिकांनी अशा उपक्रमांची सतत अपेक्षा व्यक्त केली आहे.

**"जनतेच्या सोयीसाठी आणि त्यांच्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. नागरिकांचा विश्वास आणि पाठिंबा हेच आमचे बळ आहे. अशा उपक्रमांद्वारे आम्ही सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करत आहोत."**

**- निलेशभाऊ गिरमे, आयोजक**

# फ्रँकलिन टेम्पलटनतर्फे फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंडाचा शुभारंभ

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

फ्रँकलिन टेम्पलटन (इंडिया) ने गुंतवणूकदारांसाठी फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंड (एफआयएमएफ) या नवीन फंड योजनेच्या शुभारंभाची घोषणा केली आहे. ही प्रामुख्याने मुदतमूक्त स्वरुपातील इक्विटी फंड योजना आहे. ही योजना विविध घटकांआधारे संख्यात्मक गुंतवणूक धोरणाचा वापर करणार आहे. गुणवत्ता, मूल्य, भावना आणि पर्याय (QVSA) यासारख्या घटकांच्या आधारे समभाग निवडीकरिता फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंड डेटावर आधारलेला तसेच सुनियोजित असा दृष्टिकोन वापरणार आहे. सध्याच्या गुंतवणूक विश्वात बाजार भांडवलीकरणानुसार भारतात ५०० कंपन्या उपलब्ध असून या आघाडीच्या कंपन्या शेअरबाजारात सुचीबध्द आहेत. फंड व्यवस्थापकाच्या अंतर्दृष्टीकोनासह शिस्तबद्ध गुंतवणूक पध्दत तसेच गुंतवणूकीसाठी विशिष्ट प्रारुप (मॉडेल) यांचा मिलाफ घडवत गुंतवणूकदारांना जोखीम-आधारित परतावा प्रदान करणे, हे या फंडाचे उद्दिष्ट आहे. हा एनएफओ येत्या १० नोव्हेंबर २०२५ ते २४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान गुंतवणूकीसाठी खूला राहणार असून प्रति युनिट १० रुपये दराने उपलब्ध राहणार आहे.

फंडाच्या शुभारंभप्रसंगी बोलताना फ्रँकलिन टेम्पलटन-इंडियाचे अध्यक्ष अविनाश सातवळेकर (Satwalekar) म्हणाले, "आपल्या सर्वांच्या सध्याच्या दैनंदिन जीवनात तंत्रज्ञान हा घटक अतिशय सखोल रुजला आहे. आपण काम कशा पध्दतीने करतो, संवाद कसा साधतो आणि दैनंदिन निर्णय कसे घेतो, हे सारे तंत्रज्ञानाने पार बदलून टाकले आहे. तंत्रज्ञानातील प्रगती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा उदय यामुळे आता अतिशय व्यापक स्तरावर माहितीचे विश्लेषण करण्यासाठी परिमाणात्मक असे डेटा मॉडेल तयार करणे शक्य झाले आहे आणि हे मॉडेल पोर्टफोलिओ व्यवस्थापकांना गुंतवणूकीच्या संधी शोधण्यास मदत करू शकते. फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंड (FIMF) म्हणजे गुंतवणूक धोरणांमध्ये तंत्रज्ञानाच्या या एकत्रीकरणाचे उदाहरण होय. हा फंड प्रगत तंत्रज्ञान आणि डेटा विश्लेषण यांच्या एकत्रीकरणातून व्यापक स्वरुपात गुंतवणूकीचा पर्याय सादर करतो आणि त्यावर तज्ज्ञ व्यक्तींचे बारकाईने लक्ष राहणार आहे."

ते पुढे म्हणाले, "फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंड आमच्या गुंतवणूकदारांना सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. बाजाराच्या परिस्थितीशी जुळवून घेणारा तसेच जोखीमेबाबत सदैव दक्ष असलेला हा फंड बाजाराच्या वेगवेगळ्या चक्रांमध्ये शाश्वत मूल्य प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे."

फ्रँकलिन टेम्पलटन इनव्हेस्टमेंट सोल्युशन्सचे कार्यकारी उपाध्यक्ष आणि प्रमुख ॲडम पेट्रीक (Petryk) म्हणाले, "विविध गुंतवणूक योजनांच्या माध्यमातून फ्रँकलिन टेम्पलटन सुमारे ९८ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूकीचे व्यवस्थापन सध्या सांभाळत आहेत. १६० पेक्षा अधिक वर्षांच्या एकत्रित गुंतवणूक कौशल्यासह ठसा उमटविणारी आमची जागतिक पातळीवर कार्यरत गुंतवणूक टीम सखोल अनुभव, अतिशय शिस्तबध्द तसेच आगळावेगळा दृष्टिकोन गुंतवणूकीसाठी वापरते आणि तो पारंपारिक मूलभूत गुंतवणूक शैलीपेक्षा अतिशय वेगळा आहे. आरओई, मूल्यांकन आणि कमाईची गती यासारख्या समभागाशी संबंधित खास निर्देशकांना भविष्यसूचक संकेत आणि ढोबळ आर्थिक परिस्थितीवर आधारलेल्या दृष्टीकोनाशी जोडत आम्ही भारतीय गुंतवणूकदारांना डेटावर आधारलेली, बदलत्या बाजार परिस्थितीशी जुळवून घेणारी आणि सक्षम आर्थिक तर्कावर आधारलेली परिपूर्ण अशी रणनीती सादर करतो. त्याचबरोबर आम्ही या गुंतवणूक प्रारूपावर तज्ज्ञ व्यक्तींचे सातत्याने लक्ष ठेवत गुंतवणूकीच्या धोरणात लवचिकता राखतो. अशा प्रकारे डेटा-आधारित दृष्टीकोनाला मानवी निर्णयाची जोड देण्याची खबरदारी घेत आम्ही गुंतवणूक धोरणांच्या अंमलबजावणीत लवचिकता राखतो."

फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंडचे फंड व्यवस्थापक अरिहंत जैन म्हणाले: "फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंड विविधांगी पोर्टफोलिओ साकारण्यासाठी शिस्तबद्ध, गुणात्मक पध्दतीचा अवलंब करतो. या मूलभूत परिमाणात्मक पध्दतीत (क्वांट मॉडेल) गुणवत्ता, मूल्य, भावना आणि पर्याय या चार प्राथमिक श्रेणींमध्ये विभागणी केलेल्या विविध घटकांच्या विस्तृत संचाचा वापर करून समभागांचे मूल्यांकन केले जाते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सोनालिका ट्रॅक्टर्सकडून नव्या विक्रमी कामगिरीची नोंद

- **ऑक्टोबर २०२५ मध्ये आजवरची सर्वाधिक एकंदर २७,०२८ ट्रॅक्टर्सची विक्री**

**पुणे (आरंभ पर्व) : भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने ऑक्टोबर २०२५ मध्ये आजवरच्या सर्वाधिक मासिक विक्रीची कामगिरी नोंदवत २७,०२८ ट्रॅक्टर्सची विक्री केली आहे. जीएसटी कपातीनंतरचा हा सर्वात मोठा महिना ठरला असून, ही कामगिरी अचंबित करणारी आहे. उद्योगातील इतर प्रमुख ब्रँड्सच्या तुलनेत सर्वाधिक एकंदर ३४.८ टक्के वाढीची या कामगिरीला चालना मिळाली असून ही वाढ संपूर्ण ट्रॅक्टर उद्योगाच्या वाढीपेक्षा २.३ पट (अंदाजे) अधिक आहे. कंपनीने याच महिन्यात बाजारातील वाट्यामध्ये २.२ टक्के वाढीची नोंद केली आहे. कंपनीची नाविन्यपूर्णता, शेतकरीकेंद्रित धोरण आणि सर्व टीम व डीलरशिपमध्ये सहयोगाचे त्यात प्रतिबिंब पडले आहे. प्रत्येक शेतातील शेतकऱ्यांच्या खऱ्याखुऱ्या गरजांचे योग्य निराकरण व्हावे याची सोनालिका कंपनी सतत काळजी घेते. कंपनीने या महिन्यात सर्वाधिक डिलिव्हरी, बिलिंग आणि जागतिक क्रमांक १ ट्रॅक्टर प्लांटमध्ये उत्पादनाची नोंद करून अनेक नवीन विक्रम प्रस्थापित केले आहेत. हे सर्व सखोल नियोजन, उत्कटता आणि सामूहिक क्षमतेवरील विश्वासाच्या जोरावर शक्य झाले आहे. हे यश केवळ तांत्रिक क्षमतेपुरते मर्यादित नसून शेतामध्ये श्रमणाऱ्या हातांशी कंपनी किती सखोलपणे समरस आहे याचे या कामगिरीत प्रतिबिंब पडले आहे आणि निश्चय व कठोर मेहनतीचे हे प्रतीक आहे.**

### कुंडेश्वर घाट परिसर दुर्घटना टाळण्यासाठी शासकीय निधी

- **आमदार काळे यांच्या पाठपुराव्याला यश**

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील कुंडेश्वर मंदिर घाट परिसरात घडलेल्या अपघातामुळे स्थानिक ग्रामस्थ व भाविकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. या भागात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर भाविक, पर्यटक ये-जा करतात. घाट रस्ता अरुंद, उतार आणि वळणदार असल्याने अपघाताची शक्यता वाढत होती. या पार्श्वभूमीवर आमदार बाबाजी काळे यांनी संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना करण्याचे निवेदन दिले होते. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच जिल्हाधिकारी पुणे आणि अधिकारी वर्गाशी सातत्याने पाठपुरावा केला. व अपघात टाळण्यासाठी सुरक्षात्मक उपाययोजनांचे काम" या प्रकल्पासाठी रु. ९,५७,७००/- इतका निधी मंजूर करून घेण्यात यश आले. ११ ऑगस्ट २०२५ रोजी कुंडेश्वर येथे झालेल्या अपघातात बारा भाविकांचा मृत्यू झाला होता. याविषयी आमदार काळे यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर या कामास शासनस्तरावर मंजुरी मिळाली आहे. जिल्हा नियोजन समिती पुणे यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, "पात्र ग्रामीण विकास निधीअंतर्गत कूंडेश्वर मंदिर प्रांगण परिसरातील अपघात टाळण्यासाठी सुरक्षात्मक उपाययोजनांचे काम" या प्रकल्पासाठी रु. ९,५७,७००/- इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.**



### राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी किसान सभेच्या अध्यक्षपदी विपिन गाटे यांची निवड

**बार्शी (आरंभ पर्व) : सारोळे (ता. बार्शी) येथील तरुण आणि मेहनती शेतकरी विपिन भीमराव गाटे (पाटील) यांची राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी किसान सभा बार्शी तालुका अध्यक्षपदी निवड झाली आहे. ही निवड जाहीर होताच बार्शी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र कौतुक होत आहे. निवडीचे पत्र सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी कॉँग्रेस अध्यक्ष उमेशदादा पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा सरचिटणीस प्रमोद कापसे, किसान सभा जिल्हा अध्यक्ष सागर लाड, औदुंबर कापसे, ज्ञानेश्वर निचळ,सोमनाथ पाटील, संताजी भोसले ,गणेश चौधरी, प्रवीण गाटे उपस्थित होते.**

















# काकडा आरतीने प्रभागात श्रद्धा, एकता आणि उत्साहाचे वातावरण फुलले

**लक्ष्मण साबळे**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभागात सकाळच्या काकडा आरतीने भक्तीमय आणि सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. पहाटेच्या थंड वाऱ्यासह आरतीचे मंगल ध्वनी, फुलांचा सुगंध, आणि दिव्यांच्या प्रकाशाने संपूर्ण परिसर उजळून निघाला. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धेने आरतीत सहभाग नोंदवला.

दररोज पहाटे होणाऱ्या या आरतीमुळे प्रभागातील नागरिकांमध्ये एक वेगळाच उत्साह पाहायला मिळत आहे. महिलांचा, तरुणांचा आणि ज्येष्ठांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येत असून, प्रत्येकजण आपापल्या परीने या उपक्रमात योगदान देत आहे. मंदिर परिसरात फुलांची सजावट, प्रसाद वितरण आणि स्वच्छतेची काळजी या सर्व गोष्टींमुळे वातावरण अधिक आकर्षक बनले आहे.

या आरतीमुळे केवळ धार्मिक कार्यक्रम होत नाही, तर समाजातील एकतेचा आणि आपुलकीचा संदेश दिला जात आहे. नागरिक एकमेकांना भेटतात, संवाद साधतात आणि समाजात सौहार्दाचे वातावरण निर्माण करत आहेत. निवडणुकीचे राजकीय वातावरण असले तरी, या आरतींमुळे लोकांना श्रद्धा आणि शांततेचा एक क्षण अनुभवायला मिळत आहे.

सर्वपक्षीय इच्छुक उमेदवार जनतेशी संवाद साधण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करत आहेत. सकाळच्या आरतीत सहभागी होताना ते नागरिकांच्या समस्या जाणून घेत आहेत आणि देवाच्या चरणी प्रार्थना करत आहेत की "आपल्या भागाचा विकास व्हावा, जनता आनंदी राहावी."

या उपक्रमामुळे प्रभागात सकारात्मक आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. आरतीच्या सुरांमध्ये राजकीय गोंधळाला थोडी विश्रांती मिळाली आहे.

एकूणच, या काकडा आरतीमुळे प्रभागात श्रद्धा, प्रेम आणि समाजभावनेचा दिवा प्रज्वलित झाला आहे. ही आरती फक्त देवाप्रती भक्ती व्यक्त करणारी नसून, माणसांमधील नातं घट्ट करणारी ठरली आहे.

आरतीचे सूर, भक्तिभावाने उजळलेले चेहरे आणि एकतेचा संदेश प्रभागात आता प्रत्येक सकाळ नवी उर्जा आणि आशेची किरण घेऊन उगवत आहे.

**कै. वसंतराव कोंढरे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त**

# माय माऊली केअर सेंटरमध्ये जीवनावश्यक साहित्य वाटप

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी येथील कै. वसंतराव खंडुजी कोंढरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन म्हणून एक हृदयस्पर्शी सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. पुणे येथील माय माऊली केअर सेंटर, कात्रज येथे गरजूंना ब्लँकेट तसेच जीवनावश्यक साहित्य वाटप करून त्यांच्या मानवतेच्या कार्याला पुढे नेण्यात आलं.

कै. कोंढरे यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या आयुष्यभर जपलेल्या समाजसेवेच्या विचारांना साकार स्वरूप देत या उपक्रमातून प्रेम, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

या प्रसंगी त्यांचेपपत्नी विमल कोंढरे, पुत्र अविनाश कोंढरे, मुली अरुणा सावले, अर्चना साठे, सोनाली वाशीवाले व सर्व नातेवाईकांनी एकत्र येऊन सहभागी होत त्यांच्या



पितृस्मृतीस अभिवादन केलं. कै. वसंतराव कोंढरे हे आपल्या आयुष्यात लोकहितासाठी सदैव तत्पर राहिले. समाजासाठी काहीतरी देण्याची त्यांची तळमळ या उपक्रमातून पुन्हा जिवंत झाली.

त्यांचा "समाजासाठी जगणं हेच खरं आयुष्य" हा विचार आजही त्यांच्या परिवारासाठी प्रेरणादायी ठरतो आहे. या भावपूर्ण सामाजिक कार्यातून कोंढरे परिवाराने आपल्या पितृस्मृतीस खरी श्रद्धांजली वाहिली आणि समाजसेवेची परंपरा जिवंत ठेवली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित स्वप्निल लंकेश्वर यांची लोकसेवेची झुंज

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शीतील लोकमान्य चाळ, जामगाव रोड ग्राउंड परिसरात जनतेच्या हितासाठी झटणारा एक तरुण कार्यकर्ता आज चर्चेचा विषय ठरत आहे — शांत संयमी! वंचित समाजाच्या प्रश्नांवर काम करताना, तो केवळ कार्यकर्ता नाही तर सामाजिक न्याय, समता आणि सेवा या मूल्यांचा खरा प्रतिनिधी आहे.

नगरपालिकेतील, तहसील कार्यालयातील प्रशासकीय कामे असोत,पाण्याच्या टाकीची मोटार वारंवार बंद पडण्याची समस्या असो,

स्वच्छता, फवारणी किंवा नागरिकांच्या मूलभूत अडचणी असोत — या प्रत्येक ठिकाणी शांत संयमी स्वतः पुढे येऊन लोकांचा आवाज बनतो. या सर्व कार्यामागे आहे स्वप्निल लंकेश्वर यांचं




प्रेरणादायी, संघटनक्षम नेतृत्व.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली शांत संयमी यांनी रस्त्यावरच्या लढ्यापासून ते सामाजिक प्रश्नांपर्यंत ठामपणे लोकांसोबत उभं राहून काम केलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा" या विचारधारेवर चालणाऱ्या या नेतृत्वाने सामाजिक परिवर्तनाचा मार्ग स्वीकारला आहे.

याच प्रेरणेने प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून ते आज वंचित, शोषित आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी लढा देत आहेत. या नेतृत्वाची पायाभरणी आंबेडकर विचारांनी झालेली असून, या सेवाभावी कार्यामुळे शांत संयमी आणि स्वप्निल लंकेश्वर या जोडीला भविष्यात निश्चितपणे मोठी संधी आणि जनतेचा आशीर्वाद लाभेल. बार्शी नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित हे नेतृत्व आज लोकसेवेचं आणि जनविश्वासाचं खरं प्रतीक ठरत आहे! बार्शी नगरपालिका निवडणुकीच्या प्रभाग क्रमांक चार मधून ते नशीब आजमावणार आहेत.. या नव्या नेतृत्वाकडे बार्शीकर कसे पाहतात हे आगामी काळात दिसणार आहे..

## थोडक्यात पण महत्वाचे



## सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक नियुक्त्या

सोलापूर (आरंभ पर्व) : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सोलापूर जिल्हा संघटन बळकटीसाठी महत्त्वपूर्ण नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मान्यतेने, जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि जिल्हा सरचिटणीस प्रमोद कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. जिल्हा स्तरावरील महत्त्वाच्या पदांसाठी खालील कार्यकर्त्यांची निवड झाली आहे. त्यामध्ये प्रदीप नेमचंद कासार, बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) – जिल्हा कार्यकारिणी सदस्य, सचिन गायकवाड – तालुका अध्यक्ष, सामाजिक न्याय विभाग, बार्शी, जोगेंद्र गायकवाड – जिल्हा उपाध्यक्ष, सामाजिक न्याय विभाग, सोलापूर, विपिन भीमराव गाटे – तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी किसान सभा, बार्शी मंगेश देशमुख पद -कार्याध्यक्ष किसान सेल सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या नव्या नियुक्त्यांमुळे सोलापूर जिल्ह्यात पक्षाची संघटना अधिक मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे ध्येय–धोरण जनतेपर्यंत पोहोचविणे आणि शेतकरी, कामगार, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याचे उद्दिष्ट या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे. यावेळी भालशंकर सर... जिल्हाध्यक्ष सामाजिक न्याय आणी सागर ताड जिल्हाध्यक्ष किसान सेल आदी मान्यवर उपस्थित होते.

## गेरा डेव्हलपमेंट्सकडून हृतिक रोशनची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती



पुणे (आरंभ पर्व) : गेरा डेव्हलपमेंट्स प्रा. लि. (GDPL)- पुणे, गोवा, बेंगळुरू आणि कॅलिफोर्निया (अमेरिका) येथे नावाजलेले आणि पुरस्कारप्राप्त प्रकल्प साकार करणारे रिअल इस्टेट क्षेत्रातील अग्रगण्य नाव - यांनी पुन्हा एकदा शहरी जीवनशैलीची नवी व्याख्या सादर केली आहे. "गेरा वेलनेस सेंट्रिक होम्स" ही भारतातील पहिलीच अशी संकल्पना आहे, जी सर्वांगीण आरोग्याला दैनंदिन जीवनाचा मोजता येणारा भाग बनवते. "चाइल्ड सेंट्रिक होम्स द्वारे आधुनिक कुटुंबांसाठी जीवनाचा नवा दृष्टीकोन निर्माण केल्यानंतर, गेरा डेव्हलपमेंट्स आता वेलनेस थेट घरात घेऊन आले आहे. वेलनेससेंट्रिक होम्स ही अशी राहणीमान संकल्पना आहे जिथे मन, शरीर आणि आत्म्याचा समतोल विज्ञानाधारित डिझाइन, नियोजित वेलनेस कार्यक्रम आणि समुदायातील सहभाग यांच्या माध्यमातून साधला जातो.

# मोफत नेत्रतपासणी शिबिर आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला प्रतिसाद

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

भाजप पुणे शहराच्या सचिव सौ. रोहिणीताई रहाणे यांच्या पुढाकाराने आत्मनिर्भर भारत अभियान अंतर्गत धायरी येथील सूर्योदय वृद्धाश्रम येथे मोफत नेत्र तपासणी व अल्प दरात चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शंभर ते दीडशे नागरिकांनी, विशेषतः महिलांनी, या शिबिराचा लाभ घेतला. तपासणीनंतर नागरिकांना अत्यल्प दरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला मनीषा ताई लडकत (पुणे शहर अध्यक्षा, महिला मोर्चा, भाजपा) प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी समाजसेवेच्या माध्यमातून महिलांच्या आरोग्य व स्वावलंबनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. तसेच समूह संघटीका मंदाताई आणि सुजाता ताई यांनी महिलांसाठी उपलब्ध असलेल्या महानगरपालिका व शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली.



या शिबिरात दुधभाते नेत्रालय यांचे वैद्यकीय पथक सहभागी झाले होते. वयोवृद्ध, महिला आणि युवक-युवतींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सौ. रोहिणीताई रहाणे म्हणाल्या, "सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने महिलांना सक्षम बनविण्यासाठी असे उपक्रम पुढेही राबविले जातील."

हा उपक्रम महानगरपालिका आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने यशस्वीरीत्या पार पडला.






# जनतेच्या सेवेसाठी समर्पित पोकळे दांपत्य

**मिशन महानगरपालिका**
**प्रभाग क्रमांक ३४**

## "विकास आणि प्रामाणिकपणा हीच आमची ओळख" : बापूसाहेब व प्रीतीताई पोकळे पाटील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीची हवा वेग घेत असताना, प्रभाग क्रमांक ३४ मध्ये जनतेच्या मनावर ठसा उमटवणारे एक नाव ठळकपणे पुढे येत आहे — ते म्हणजे पोकळे दांपत्य, म्हणजेच बापूसाहेब पोकळे पाटील आणि प्रीतीताई पोकळे पाटील.

सामाजिक कार्य, जनसंपर्क आणि प्रामाणिक वागणुकीमुळे हे दांपत्य आज प्रत्येक नागरिकाच्या ओळखीचं झालं आहे. त्यांच्या कार्याचा विस्तार इतका मोठा आहे



की महिलांपासून ते बालकांपर्यंत, तर वृद्धांपासून ते युवकांपर्यंत प्रत्येक घटकाला त्यांनी जोडून घेतले आहे.

दैनिक आरंभपर्व – मिशन महानगरपालिका २०२५ सदरात दोघांशी संवाद साधला असता, त्यांच्या शब्दांतून प्रामाणिक सेवाभाव आणि विकासाचं ध्येय स्पष्ट जाणवत होतं.

संवादात प्रीतीताई म्हणाल्या, "महानगरपालिकेचं काम केवळ विकासकामांपुरतं मर्यादित नाही. नागरिकांच्या जीवनात बदल घडवणं, महिलांना आत्मनिर्भर बनवणं, मुलांना प्रोत्साहन देणं, हे सगळं तितकंच महत्त्वाचं आहे. आम्ही जनतेच्या समस्या प्रत्यक्ष ऐकतो आणि त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करतो."

त्यांनी पुढे सांगितले की, गेल्या काही वर्षांत महिलांसाठी 'होम मिनिस्टर' स्पर्धा, मुलांसाठी 'बाल यात्रा', नागरिकांसाठी तीर्थदर्शन सहली, तसेच आरोग्य व रक्तदान शिबिरे अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजाशी घट्ट नातं जोडण्यात आलं आहे.

कोरोनाच्या कठीण काळातही त्या स्वतः मैदानात उतरल्या. "त्या काळात लोकांना मदतीची गरज होती. आम्ही शक्य तितक्या घरांपर्यंत अन्नधान्य, औषधे आणि सहाय्य पोहोचवलं. हीच खरी सेवा आहे," असं त्यांनी नमूद केलं.

राजकीय आणि संघटनात्मक पातळीवर सातत्याने कार्यरत असलेल्या बापूसाहेब पोकळे पाटील यांनीही स्पष्ट सांगितले,

"राजकारण हे पदासाठी नाही, तर जनतेच्या हितासाठी करायचं असतं. आमदार भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली आम्ही प्रभागातील अनेक प्रश्न सोडवले आहेत. पाणी, रस्ते, वीज, कचरा — या सगळ्या मूलभूत प्रश्नांवर सातत्याने काम करत आलो आहोत."

ते पुढे म्हणाले, "जनतेचा विश्वास हेच आमचं खरं बळ आहे. आम्ही कोणाच्याही विरोधात नाही, तर सगळ्यांना घेऊन पुढे जाण्याचा विचार करतो. विकास हा राजकारणापेक्षा मोठा विषय आहे — आणि आम्ही त्याच्यासाठी कटिबद्ध आहोत."

प्रभाग क्रमांक ३४ मधील नागरिकांमध्ये आज "पोकळे दांपत्य म्हणजे काम करणारे लोक" अशी ओळख निर्माण झाली आहे. सामाजिक कार्य, प्रामाणिक प्रतिमा आणि जनसंपर्क या तिन्ही गोष्टींमुळे त्यांच्या दावेदारीकडे पक्षातील वरिष्ठांचेही लक्ष लागले आहे.

"जनतेचा विश्वास मिळवणं हेच खरं यश आहे. सत्ता आली नाही तरी आम्ही काम थांबवणार नाही. पुणे महानगरपालिकेत आमचा आवाज जनतेसाठी, विकासासाठी आणि प्रामाणिकपणासाठी असेल." असे त्यांनी सांगितले.

**सेवाभाव, विकास आणि प्रामाणिक नेतृत्वाचा संगम असलेले बापूसाहेब आणि प्रीतीताई पोकळे पाटील — हे दांपत्य आता "मिशन महानगरपालिका "साठी पूर्ण तयारीत आहे.**

## थोडक्यात पण महत्वाचे



## श्री महावतार बाबाजींच्या कार्याची महती सांगणारा 'फकिरीयत'...

पुणे (आरंभ पर्व) : क्रियायोगाचे प्रणेते श्री महावतार बाबाजी जे हजारो वर्षांपासून हिमालयाच्या पावन धरतीवर संचार करीत आहेत अशा रहस्यमय हिमालयीन योग्याची भेट आपल्याला 'फकिरीयत' या आगामी हिंदी चित्रपटात घडणार आहे. आध्यात्म, गुरूभक्ती, क्रियायोग आणि श्रद्धा यांची प्रचिती देणाऱ्या गुरूमाई माँ रुद्रात्मिका यांच्या आध्यात्मिक प्रवासावर हा चित्रपट आधारलेला आहे. या हिंदी चित्रपटाच्या रूपात श्री महावतार बाबाजी, श्री रामकृष्ण परमहंस, श्री स्वामी समर्थ, श्री शंकर महाराज, बाबा श्री कालभैरव, बाबा श्री भद्रबाहू, हेडाखान बाबा, माँ काली यांचे दर्शन आणि यासोबतच गुरुमाई माँ रुद्रात्मिका यांचा त्यांच्या गुरु कार्यासाठीचा संघर्ष पाहायला मिळणार आहे. २८ नोव्हेंबर रोजी 'फकिरीयत' प्रदर्शित होणार आहे. 'फकिरीयत' चित्रपटाची निर्मिती भद्रबाहू डिव्हाइन क्रिएशन्स एलएलपीच्या बॅनरखाली करण्यात आली आहे. दिग्दर्शक संतोष मांजरेकर यांनी 'फकिरीयत'चे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाची कथा 'चिरुट जलती है' आणि 'अध्यात्म एक विद्रोह, एक क्रांती' या श्री गुरुमाई यांनी लिहिलेल्या पुस्तकांवर आधारलेली आहे. पटकथालेखन अनिल पवार यांनी केले असून, अनिल पवार यांनीच श्री गुरुमाई यांच्यासोबत संवादलेखनही केले आहे. श्री महावतार बाबाजींची शिकवण, त्यांचे विचार, त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांची अनुभूती 'फकिरीयत' चित्रपट पाहिल्यावर येणार असून, ही केवळ बाबाजींच्या महतीची आध्यात्मिक वाटचाल नसून, त्यांच्या शिष्येला द्याव्या लागलेल्या संघर्षाची गाथाही आहे. हा चित्रपट संगीतप्रेमींसाठी आध्यात्मिक गीत-संगीताची अनोखी मेजवानी घेऊन आला आहे. संतविचारांना सुमधूर संगीताची सुरेल जोड देण्यात आली आहे. "चलो चले हम बाबाजी के देस...", "गुरु मै तेरे शरण...", "इतना गुरुर मत कर..." ही या चित्रपटातील गाणी मनामनांत भक्तीभावाची ज्योत प्रज्ज्वलित करणारी आहेत.



## महाज्योतीच्या स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांवर अन्याय

पुणे (आरंभ पर्व) : OBC समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या महाज्योती संस्थेच्या धोरणात्मक निर्णयांमुळे स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याचा आरोप होत आहे. या निर्णयांमुळे केवळ शैक्षणिक संधींवर मर्यादा येत नसून, संस्थेच्या पारदर्शकतेवरही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. UPSC, MPSC यांसारख्या प्रमुख स्पर्धा परीक्षांसाठी महाज्योतीतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाच्या जागा मागील काही महिन्यांत जाणूनबुजून कमी केल्या गेल्या असल्याचे समोर आले आहे. या निर्णयामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या करिअरच्या संधींना तडा गेला असून, शिक्षण क्षेत्रात असमानता वाढल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

# प्रभागातील जनतेचा विकासाचे स्ट्रक्चर आर्किटेक्चर नरेंद्र हगवणे

**खडकवासला शिवणे धायरी प्रभागातील राजकीय वातावरण सध्या जोरात ढवळत आहे. 'दैनिक आरंभ पर्व' ने मिशन महानगरपालिका सदरामध्ये विविध मान्यवराशी संवाद साधला आहे.**






**(दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते नरेंद्र हगवणे यांनी आरंभपर्वशी संवाद साधला.. स्वतः आर्किटेक्चर असलेले हगवणे भागाच्या विकासासाठी अविरतपणे काम करत आहेत.

"एकच कॉल प्रॉब्लेम सॉल"अशी त्यांची ओळख आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील शिवणे, धायरी, किरकटवाडी, कोल्हेवाडी आणि नांदोशी या समाविष्ट गावांमध्ये आजही मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. रस्ते, नाले, पाणीपुरवठा, सार्वजनिक सोयी, खेळाची मैदाने – या सर्व क्षेत्रात विकासाची आस नागरिकांनी बाळगली आहे. या अपेक्षांना दिशा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार अभियंता सेल पुणे जिल्हा उपाध्यक्ष - शहर,खडकवासला विधानसभा युवक उपाध्यक्ष ह्या पदावर नरेंद्र हगवणे समर्पणाने काम करत आहेत.

व्यवसायाने आर्किटेक्ट, पण मनाने जनतेच्या जीवनाचा खरा शिल्पकार असलेले नरेंद्र हगवणे गेली अनेक वर्षे पक्षासाठी व समाजासाठी न थकता झटत आहेत. किरकटवाडी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच म्हणून त्यांनी प्रामाणिकपणे सेवा देत ग्रामविकासात नवे मापदंड निर्माण केले. "इमारतींचे आराखडे काढत आलो, पण आता माझं ध्येय आहे - जनतेच्या आयुष्याचा विकासाचा आराखडा तयार करणं," असे भावनिक उद्गार नरेंद्र हगवणे यांनी 'आरंभपर्व'शी बोलताना व्यक्त केले.

त्यांनी पुढे सांगितले – "या समाविष्ट गावांमध्ये अजूनही भौतिक सुविधांचा अभाव आहे. नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा मिळाव्यात म्हणून आम्ही कटिबद्ध आहोत. जनतेच्या समस्या माझ्या स्वतःच्या समस्या आहेत."

या भागात डंपर वाहतुकीमुळे होत असलेल्या प्रदूषण, आवाज आणि अपघातांच्या समस्येवरही त्यांनी स्पष्ट मत मांडले – "या परिसरातील जडवाहतूक नागरिकांसाठी त्रासदायक ठरली आहे. या डंपर वाहतुकीवर कायमस्वरूपी उपाय आवश्यक आहे. नागरिकांना शांत, सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण मिळाले पाहिजे."

खासदार सुप्रियाताई सुळे यांच्याशी असलेले त्यांचे निकट व विश्वासाचे संबंध त्यांच्या कार्याला अधिक बळ देतात. लोकसभा असो वा विधानसभा निवडणूक – प्रत्येक वेळी पक्षासाठी अविरतपणे, मनापासून काम केले आहे. बॅनरबाजी आणि प्रसिद्धीच्या पलीकडे राहून, जनतेच्या सेवेला प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून नरेंद्र हगवणे जनमानसात घर करून बसले आहेत.

किरकटवाडी, कोल्हेवाडी आणि नांदोशी भागातील जनता त्यांना आपला "जनतेचा माणूस" मानते.

त्यांच्या दारात कोणतीही अडचण घेऊन गेले की ती समस्या स्वतःची समजून ते धाव घेतात - हीच त्यांची खरी ओळख आहे.

आज नरेंद्र हगवणे म्हणतात - "राजकारण म्हणजे प्रसिद्धी नव्हे, तर जनतेच्या मनातील विश्वास जपणे.

पक्षाने संधी दिल्यास या प्रभागाचा चेहरामोहरा बदलणं हेच माझं स्वप्न आहे." उमेदवारी बाबत पक्ष जो काही निर्णय घेईल तो मला मान्य असेल पक्षाच्या पक्षाचा आदेश म्हणून मी निश्चितपणे काम करेल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## वडगाव बुद्रुक परिसरातील मोकळ्या जागेची स्वच्छता



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोकमत परिसराजवळील अथर्व बँक्वेट हॉल लेनलगत पुणे महानगरपालिकेची एक मोकळी जागा मोठ्या प्रमाणात झाडे, झुडपे आणि गवतांनी व्यापलेली होती. या ठिकाणी साप, डास आणि इतर कीटक वाढल्याने आसपासच्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

ही बाब श्री. शरद किसन दबडे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने कारवाई केली. आज त्यांनी स्वतः त्या ठिकाणी जाऊन जेसीबीच्या साहाय्याने संपूर्ण जागेची स्वच्छता करून परिसर पूर्णपणे साफ करून घेतला. या उपक्रमामुळे नागरिकांना दिलासा मिळाला असून परिसर पुन्हा स्वच्छ आणि सुरक्षित झाला आहे. नागरिकांनी दबडे यांच्या या तत्परतेचे आणि जनतेसाठी घेतलेल्या जबाबदारीचे मनापासून कौतुक केले आहे.

**● शरद दबडे यांचा पुढाकार**

शरद दबडे म्हणाले -"काम बोलतं... मी काम करत आलोय आणि काम करत राहणार! नागरिकांच्या हितासाठी हेच माझं ध्येय आहे."

## राऊत गटाकडून सुरेश गुंड यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून ,अर्ज दाखल करण्याच्या पहिल्याच दिवशी सुरेश उर्फ सूर्यकांत गुंड यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी चेअरमन रणवीर राऊत यांच्या समवेत पहिलाच अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक खऱ्या अर्थाने रंगू लागल्याचे चित्र दिसत आहे.बऱ्याच अवधीनंतर अखेर बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक पार पडत आहे तीन तारखेपासून म्हणजे आजपासून उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात झाली असून सात तारखेच्या दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज दाखल करून घेतले जाणार आहेत. यामध्ये सहकारी संस्था मतदार संघाच्या ११ जागा असो साधारण सात जागा महिला राखीव दोन जागा इतर मागासवर्गीय एक जागा विमुक्त जाती भटक्या जमातीसाठी एक जागा ग्रामपंचायत मतदार संघासाठी चार जागा सर्वसाधारण दोन अनुसूचित जाती एक आर्थिक दृष्ट्या दुर्बल एक व्यापारी मतदारसंघ दोन हमाल व तोलार मतदारसंघ एक अशा एकूण १८ जागांसाठी निवडणूक होत आहे. सहकारी संस्था मतदारसंघांमध्ये यापूर्वी १६४३ मतदार होते आता नव्याने दोन वाढल्या असून एकूण मतदार संख्या १६४५झाली आहे. तर व्यापारी मतदारसंघांमध्ये १५५१ मतदार आहेत हमाल पोलार मतदार संघामध्ये एक हजार पंचवीस मतदार आहेत तर ग्रामपंचायती मतदारसंघांमध्ये १०३९ मतदार आहेत.

एकूण ५२६० मतदार बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सत्ता कोणाची आणायची हे ठरणार आहेत. पारदर्शक कारभार, शेतकऱ्यांना न्याय आणि हमीभाव यासह शासकीय निर्णय राबवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणारे सत्ताधारी हवेत असे मतदारांचे म्हणणे आहे.

नामनिर्देशन पत्र दाखल करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी चेअरमन रणवीर राऊत, बार्शी वकील संघाचे अध्यक्ष रणजित गुंड, विधीज्ञ राजकुमार गुंड, अभिजीत कापसे, नंदकुमार पाटील, कृष्णात माळी, संदीप मिरगणे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.

### शिवणे-कोंढवे धावडे, ऊत्तमनगर, कोपरे परिसरातील

## नागरिकांना अखेर वीजपुरवठ्यात मोठा दिलासा!



**वारजे (दै. आरंभ पर्व)**

शिवणे, कोंढवे धावडे, ऊत्तमनगर, कोपरे परिसरातील नागरिक वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे अत्यंत त्रस्त झाले होते. सकाळी घरगुती कामांमध्ये अडथळे, संध्याकाळी मुलांच्या अभ्यासात व्यत्यय, तर रात्री व्यवसायिक आणि स्वयंपाकाच्या कामांमध्ये अडचणी अशी परिस्थिती निर्माण झाली होती. या गंभीर प्रश्नावर आमदार भीमराव (अण्णा) तापकीर यांनी तातडीने लक्ष दिले . भाजप नेते, सचिन विष्णू दांगट यांनी सातत्याने महावितरण अधिकाऱ्यांशी पाठपुरावा केला. त्यांच्या चिकाटीमुळे अखेर या परिसराच्या दीर्घकालीन समस्येवर तोडगा निघाला आहे. महावितरणतर्फे मुठा नदीवर नवीन वीज वाहिनीचे काम युद्धपातळीवर सुरू झाले असून, आज त्या ठिकाणी लाईट केबल प्रत्यक्षात पोहोचली आहे. सचिन दांगट यांनी अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली. वीज वाहिनीचा मार्ग,शिवणे बाजूस झाडांजवळ नवीन वीजखांब उभे, तर नांदेड औद्योगिक शेडसमोर दुसऱ्या बाजूस खांब उभे करण्यात आले आहेत. या कामामुळे लवकरच संपूर्ण परिसराला अखंडित आणि स्थिर वीजपुरवठा मिळणार आहे. सचिन विष्णू दांगट यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाची भावना असून त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

## राजयोग सोसायटी परिसरात स्वच्छतेची कारवाई


**धायरी (दै. आरंभ पर्व)**

राजयोग सोसायटी परिसरात रस्त्याच्या कडेला कचरा आणि झाडांच्या झावळ्या साचल्याने नागरिक त्रस्त झाले होते. रस्ता झाडला जात नसल्याने परिसर अस्वच्छ दिसत होता. ही परिस्थिती लक्षात येताच नागरिकांनी माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांना याबाबत कल्पना दिली.. त्यानंतर श्री.नवले यांनी पालिका सहाय्यक आयुक्त सौ. प्रज्ञा पोतदार यांच्याशी संपर्क साधून तात्काळ साफसफाई करणे साठी आवाहन केले.. सहायक आयुक्त सौ.पोतदार यांनी स्वतः येऊन परिसराची पाहणी केली. यावेळी माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, सारंग नवले आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.



**● नागरिकांना दिलासा!**

नागरिकांनी स्वच्छतेबाबत काही सूचना देखील केल्या. माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांनीही याआधीही वेळोवेळी परिसरातील कचरा उचलणे आणि झाडलोट नियमित व्हावी यासाठी पालिकेला सांगितले होते. त्यावर सिंहगड रोड सौ. पोतदार मॅडम यांनी तातडीने लक्ष देण्याचे आश्वासन दिले आहे. नागरिकांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त केले असून, पुढेही परिसर स्वच्छ ठेवावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.







# "होममिनिस्टर–खेळ रंगला पैठणीचा" कार्यक्रमात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग !

## मा. सरपंच संतोष दादा मते यांनी केले आयोजन



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

एक नोव्हेंबर रोजी कोंढवे धावडे परिसरात श्री.संतोष उर्फ दिवाकर मते (माजी सरपंच) यांच्या पुढाकाराने "होममिनिस्टर–खेळरंगलापैठणीचा" हा भव्य आणि रंगतदार कार्यक्रम अत्यंत उत्साहात व आनंदमय वातावरणात पार पडला. महिलांसाठी आनंद, सन्मान आणि सक्षमीकरणाचा सुंदर संगम घडवणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने उत्सव ठरला. कार्यक्रमाला परिसरातील शेकडो माता-भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलांनी आपल्या कला, आत्मविश्वास आणि हसऱ्या चेहऱ्याने कार्यक्रमाला रंगत आणली. या होम मिनिस्टर स्पर्धेमुळे तो लाडक्या बहिणींना आनंद मिळाला.

भाजपा युवा नेते मा.किशोर दत्तात्रय पोकळे, खडकवासला भाजपा सरचिटणीस हभप सौ.ममताताई दांगट, जिल्हा उपाध्यक्ष भाजप मा.अनिलभाऊ मते, मा.सतिशभाऊ वांजळे, मा.संजय धावडे मा.अशोक आंधळे (भा.ज.पा.कामगार संघटनाअध्यक्ष) ऋतिक मोरे, निखील धावडे,अजय बाबर यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसांचा वर्षाव: कार्यक्रमातील विजेत्या महिला स्पर्धकांना स्कुटी, फ्रिज, वॉशिंगमशीन यांसारख्या भव्य भेटवस्तूंनी गौरविण्यात आले.

तसेच सर्व सहभागी भगिनींनाही प्रेमपूर्वक भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. श्री.संतोष उर्फ दिवाकर मते यांनी कार्यक्रमाच्या शेवटी सर्व महिला भगिनींना, मान्यवरांना आणि कार्यकर्त्यांना मनःपूर्वक आभार मानले.

त्यांनी सांगितले की - "हा कार्यक्रम महिलांच्या आनंदाचा आणि सन्मानाचा उत्सव आहे.

पुढेही अशा उपक्रमांद्वारे महिलांना प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील." "होममिनिस्टर–खेळरंगला पैठणीचा" हा कार्यक्रम केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता, महिलांच्या आत्मविश्वास आणि सक्षमीकरणाचा खरा उत्सव ठरला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे




### नांदेड सिटीमध्ये 'मेडपॅथ पॅथॉलॉजी'चे उद्घाटन - रुग्णसेवेसाठी नवा उपक्रम!

**पुणे (आरंभ पर्व) : नांदेड सिटीतील डेस्टिनेशन सेंटर येथे दुसऱ्या मजल्यावर (एस-४३) रुग्णांच्या सेवेसाठी अल्पदरात उत्कृष्ट सेवा देणाऱ्या "मेडपॅथ पॅथॉलॉजी लॅब"चे उद्घाटन १ नोव्हेंबर रोजी करण्यात आले. या लॅबचे उद्घाटन डॉ. शिरीष शेपाळ, श्री. सुजितजी कारले, श्री. रुपेश घुले पाटील आणि सौ. रश्मी ताई घुले यांच्या हस्ते झाले. लॅबमध्ये किड्स ब्लड कलेक्शन तसेच सर्व वयोगटांसाठी सर्व प्रकारच्या पॅथॉलॉजी टेस्ट्स उपलब्ध असल्याची माहिती उमा राय रसाळ आणि श्री. हेमेंद्र जोशी यांनी दिली. या प्रसंगी श्री. अभय खंदकर, डॉ. संतोषकुमारी चौधरी, डॉ. दीपाली कांबळे, डॉ. सचिन काटे, राजश्री औटी, गिरीशजी वसेकर, महेशजी बजाज, सुप्रिया करमरकर, विठ्ठल धर्माधिकारी, रामचंद्र पोळेकर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी मेडपॅथ पॅथॉलॉजी तर्फे रुग्णसेवेसाठी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक करत उमा राय रसाळ यांना शुभेच्छा दिल्या आणि या लॅबमुळे परिसरातील नागरिकांना सुलभ, जलद आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळेल असा विश्वास व्यक्त केला.**




### मानसिक आरोग्यविषयक माइंडफॉरवर्ड इंडिया कॉन्क्लेव्हचे आयोजन

**पुणे (आरंभ पर्व) : भारतातील नामांकित मानसिक आरोग्य तज्ज्ञ पुण्यात झालेल्या 'माइंडफॉरवर्ड इंडिया कॉन्क्लेव्ह'मध्ये एकत्र आले. शहरात प्रथमच अशा प्रकारचा हा उपक्रम झाला असून या प्रसंगी 'हॅपी स्टडीस्पेसेस' या विशेष विद्यार्थी-केंद्रित मानसिक आरोग्य उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या माध्यमातून पुण्यातील महाविद्यालयांमधील ५०,००० हून अधिक विद्यार्थ्यांना मोफत व्यावसायिक समुपदेशन आणि मानसिक आरोग्य सहाय्य उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. हा उपक्रम अपोलो हॉस्पिटल्स समूहातील 'अपोलो टेलिमेडिसिन नेटवर्किंग फाउंडेशन (ATNF)' तर्फे राबविला जात असून 'bp' (बीपी) या आंतरराष्ट्रीय ऊर्जा कंपनीचे सहकार्य त्यास लाभले आहे.**

### ४ वर्षीय तुषारची न्यूमोनियावर मात

**पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील चार वर्षीय तुषार या बालकाने 'नेक्रोटायझिंग न्यूमोनिया' या दुर्मीळ आणि जीवघेण्या आजारावर विजय मिळवला. हा आजार फुप्फुसाच्या ऊतींचे नुकसान करून श्वासोच्छवासावर गंभीर परिणाम करतो. डॉक्टरांच्या मते, तुषार पूर्णपणे बरा होणे, हा वैद्यकीय चमत्कारच म्हणावा लागेल. सुरुवातीला केवळ ताप आणि खोकल्याची किरकोळ लक्षणे होती. मात्र काही दिवसांतच आजार झपाट्याने वाढला. तुषारच्या चेहऱ्यापासून डोळ्यांच्या पापण्यांपर्यंत, मान, पोट, पाय आणि जननेंद्रियापर्यंत शरीर सुजले. त्वचेखाली हवेचे फुगे तयार होऊन शरीर फुगल्याने श्वास घेणेही कठीण झाले. 'सूर्य मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल'मध्ये दाखल केल्यावर डॉक्टरांना कळले, की तुषार 'नेक्रोटायझिंग न्यूमोनिया'ने ग्रस्त आहे. या आजारात जीवाणू फुप्फुसाच्या काही भागांवर आक्रमण करून ते 'खाऊन' टाकतात. या गुंतागुंतीच्या प्रकरणावर डॉ. सचिन शाह (संचालक, नवजात आणि बाल अतिदक्षता विभाग) आणि डॉ. अमिता कौल (प्रमुख व वरिष्ठ सल्लागार, बालरोग विभाग) यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ टीमने उपचार केले.**



### काँग्रेसचा शून्यातून फिनिक्स पक्षाप्रमाणे नवउभारणीचा संकल्प!

**पुणे (आरंभ पर्व) : देशातील आणि राज्यातील सध्याच्या परिस्थितीत जेव्हा जनतेत असंतोष, नाराजी आणि असुरक्षिततेची भावना वाढत आहे, त्या वेळी काँग्रेस पक्ष नव्या जोमानं पुन्हा उभा राहत आहे. शून्यातून फिनिक्स पक्षाप्रमाणे उभारी घेऊन, कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास, प्रोत्साहन आणि नव्या ऊर्जेचा संचार करण्यासाठी पक्ष सज्ज झाला आहे, नूतन जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील यांच्या नेतृत्वाखाली, आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते देविदास भन्साळी यांच्या मार्गदर्शनाखाली, काँग्रेस पक्षाचा हा नवा अध्याय म्हणजे संघटन, निष्ठा आणि लोकाभिमुख राजकारणाचा संकल्प आहे.**




# शनिवारी 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचा ८वा दीक्षांत समारंभ

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत ३३३४ विद्यार्थ्यांना होणार पदवी प्रदान

> **"यंदा दीक्षांत समारंभात २१ पीएच.डी., २१ सुवर्णपदकांसह एकूण ३३३४ विद्यार्थ्यांना एमआयटी एडीटी विद्यापीठाकडून पदवी प्रदान करण्यात येणार आहे. या निमित्ताने राज्यपाल मा. श्री. हरिभाऊ बागडे, प्रा. डॉ. लक्ष्मीधर बेहरा, श्री. रामानन रामनाथन आणि श्री. सुभाष त्यागी प्रथमच विद्यापीठात येत असल्याने, विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये उत्सुकता शिगेला पोचली आहे."**
> **– प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी अध्यक्ष तथा प्र-कुलपती, एमआयटी एडीटी विद्यापीठ, पुणे.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एमआयटी एडीटी), विश्वराजबाग, पुणे या विद्यापीठाचा ८वा दीक्षांत समारंभ शनिवार, दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता मोठ्या दिमाखात साजरा केला जाणार आहे. यंदाचा समारंभ राजस्थानचे राज्यपाल मा. श्री. हरिभाऊ बागडे यांच्या प्रमुख उपस्थितीत, तर विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली, स्वामी विवेकानंद मंडप, विश्वराजबाग, लोणी काळभोर येथे संपन्न होणार आहे.

यंदा एकूण ३३३४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मंडी, हिमाचल प्रदेशचे संचालक प्रा. डॉ. लक्ष्मीधर बेहरा यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच, एमआयटी एडीटी विद्यापीठाकडून भारत सरकारच्या तंत्रज्ञान, नवोन्मेष, उष्मायन व उद्यमशीलता क्षेत्रातील राष्ट्रीय तज्ज्ञ सल्लागार परिषदेचे अध्यक्ष श्री. रामानन रामनाथन यांना विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील योगदानाबद्दल 'डॉक्टर ऑफ सायन्स' (D.Sc.) ही मानद पदवी प्रदान करण्यात येणार आहे. तर 'ग्लास मॅन ऑफ इंडिया' म्हणून परिचित आणि गोल्ड प्लस ग्लास इंडस्ट्रीजचे चेअरमन श्री. सुभाष त्यागी यांना औद्योगिक नेतृत्वाबद्दल 'डॉक्टर ऑफ लेटर्स' (D.Litt.) या मानद पदवीने सन्मानित केले जाणार आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठाची २०१५ साली स्थापना झाल्यापासूनची प्रगती उल्लेखनीय आहे. यंदाच्या दीक्षांत समारंभात २१ विद्यार्थ्यांना पीएच. डी., २१ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, तर १९५ विद्यार्थ्यांना रँक होल्डर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी पालक, विद्यार्थी आणि निमंत्रितांसह सुमारे ८ हजारांहून अधिक उपस्थिती अपेक्षित आहे.

आजपर्यंतच्या सात दीक्षांत समारंभांत, माजी राज्यपाल व विद्यमान उपराष्ट्रपती मा. श्री. सी. पी. राधाकृष्णन, मा. श्री. नितीनजी गडकरी, श्री. विनोदजी तावडे, इस्रोचे माजी चेअरमन पद्मविभूषण डॉ. जी. माधवन नायर, माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, डीआरडीओचे माजी चेअरमन डॉ. जी. सतीश रेड्डी, इस्रोचे विद्यमान चेअरमन डॉ. एस. सोमनाथ आदी मान्यवरांनी हजेरी लावली आहे.

"यंदा राज्यपाल मा. श्री. हरिभाऊ बागडे यांचे उपस्थितीमुळे विद्यापीठात उत्साहाचे वातावरण आहे," अशी माहिती कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ. महेश चोपडे आणि परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव नीलवर्ण यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

## त्रिवेणी घाटे यांच्या निधनाने परीसरात शोककळा

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

कदमवाकवस्ती येथील एंजल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मा. प्राचार्या त्रिवेणी गोकुळ घाटे (वय-59) यांचे रविवारी (ता.2) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने लोणी काळभोरसह परिसरात शोककळा पसरली आहे एंजल हायस्कूलमध्ये त्रिवेणी घाटे मॅडम या शिक्षिका म्हणून वीस वर्षाहुन आधिक काळ नोकरी केली.. त्यामध्ये त्यांनी काही वर्ष प्राचार्य म्हणूनही चांगले काम केले. देखील धुरा व्यवस्थित सांभाळली आहे. एंजल हायस्कूलच्या जडणघडणीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. दरम्यान, सेवेतून निवृत्ती घेतल्यानंतर त्रिवेणी मॅडम मागील चार वर्षापासून वानवडी येथील घरी राहत होत्या रविवारी (ता.2) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने त्यां प्राणज्योत मालवली.



त्यांच्या पार्थिवावर धोबी घाट, गोळीबार मैदान येथे दुपारी दीड वाजण्याच्या सुमारा अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. प्रामाणिक, संयमी, शिस्तप्रिय व विद्यार्थीप्रीय अशी ओळख असलेले व्यक्तिमत्त्व आज हरपल्याने लोणी काळभोरसह परिसरात शोककळा पसरली आहे.

## जाईस इंडिया व बापट ऑप्टिक्स : ZEISS व्हिजन सेंटरचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ऑप्टिक्स आणि ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय अग्रणी संस्था ZEISS इंडिया ने बापट ऑप्टिक्सच्या सहकार्याने पुण्यातील कोथरूड येथे दुसऱ्या ZEISS व्हिजन सेंटरचे भव्य उद्घाटन केले. पुणे व परिसरातील नागरिकांना जागतिक दर्जाचे नेत्रतपासणी तंत्रज्ञान व प्रीमियम चष्म्यांची उपलब्धता या माध्यमातून होणार आहे.



कोथरूडमधील करिश्मा सोसायटीसमोर, कॅसाब्लांका येथील दुकान क्रमांक २ मधील १,००० चौरस फूट विस्तार असलेले हे अत्याधुनिक सेंटर प्रगत दृष्टी तपासणी तंत्रज्ञान, उच्च प्रतीच्या फ्रेम्स व वैयक्तिकृत लेन्स उपायांनी सज्ज आहे. केंद्रात ZEISS VISUFIT 1000 (3D डिजिटल सेंटरेशन) व ZEISS VISUCORE 500 (अचूक व जलद नेत्रतपासणी) यांसारखी अत्याधुनिक उपकरणे बसवण्यात आली आहेत. उद्घाटनप्रसंगी बापट ऑप्टिक्सचे संचालक ऋषिकेश बापट म्हणाले, "आजच्या गतिमान जीवनशैलीत डोळ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून जागरूकता महत्त्वाची आहे. ZEISS सोबतची भागीदारी आमच्यासाठी सन्मानाची बाब असून, जागतिक दर्जाचे नावीन्यपूर्ण उपाय पुणेकरांसाठी उपलब्ध करून देण्याचा आम्हाला अभिमान आहे."

तसेच, ZEISS इंडिया – व्हिजन केअरचे भारत व शेजारील बाजारांचे प्रमुख रोहन पॉल म्हणाले, "पुण्यात दुसरे ZEISS व्हिजन सेंटर सुरू करणे हा आमच्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, वैयक्तिक सल्लामसलत आणि प्रीमियम फ्रेम्सद्वारे आम्ही डोळ्यांच्या तपासणीच्या गुणवत्तेत नवा मापदंड स्थापित करत आहोत. नियमित नेत्रतपासणीबद्दल जागरूकता वाढविणे हे आमचे उद्दिष्ट असून, त्याद्वारे प्रगत नेत्रकाळजी अधिक सुलभ होईल."

या नवीन व्हिजन सेंटरमध्ये ZEISS SmartLife, ZEISS MyoCare (मुलांसाठी मायोपिया नियंत्रण), ZEISS DuraVision Gold UV (अतिरिक्त टिकाऊपणा व UV संरक्षण) यांसारख्या प्रीमियम लेन्सची श्रेणी उपलब्ध आहे. तसेच, विविध टिंट्स व पॉलारायझेशन असलेल्या सन लेन्सचे पर्यायही केंद्रात ठेवण्यात आले आहेत. प्रमाणित ऑप्टोमेट्रिस्टद्वारे प्रगत निदान साधनांमधून ग्राहकांना त्यांच्यासाठी योग्य असे लेन्स सोल्यूशन्स सुचवले जाणार आहेत.

## श्रीराम प्रॉपर्टीज लिमिटेडचा पुण्यात विस्तार

- **हिंजवडीमध्ये सुमारे ७०० कोटी रुपयांच्या जीडीव्ही क्षमतेसह ७ लाख चौ. फू. विकासासाठी करार**

Shriram Properties
Homes that live in you

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अग्रगण्य मिड-मार्केट आणि मिड-प्रीमियम केंद्रित निवासी रिअल इस्टेट डेव्हलपर श्रीराम प्रॉपर्टीज लिमिटेडने (एसपीएल) पुण्यातील हिंजवडी येथील अत्यंत मागणी असलेल्या मायक्रो मार्केटमध्ये सुमारे ७ लाख चौरस फूट प्रीमियम निवासी प्रकल्पाच्या विकासासाठी संयुक्त विकास करारावर (जेडीए) स्वाक्षरी केली आहे. एसपीएलचा पुण्यातील हा दुसरा प्रकल्प असून भारतातील सर्वात गतिमान रिअल इस्टेट हबमध्ये विस्तार करण्याची आणि जोरदारपणे स्थिर होण्याची तिची कटिबद्धता यातून अधोरेखित झाली आहे. कंपनीने मे २०२५ मध्ये उंड्री येथे स्वतःच्या पहिल्या प्रकल्पासह पुण्याच्या बाजारपेठेत प्रवेश केला होता. त्याला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला असून लाँचिंगच्या सहा महिन्यांतच त्याची ५५ टक्क्यांपेक्षा अधिक विक्री झाली आहे. कंपनी आता पुण्यातील हिंजवडी येथे दुसरा प्रकल्प सुरू करत आहे. हा प्रकल्प शहरी राहणीमान आणि जीवनशैली अनुभवांची नव्याने व्याख्या करणारा हाय-राइज संमिश्र वापर विकासाच्या स्वरूपात आहे. या प्रकल्पात ६.५ लाख चौरस फूट प्रीमियम अपार्टमेंट्स असून त्याला विचारपूर्वक डिझाईन केलेल्या किरकोळ आणि व्यावसायिक जागांची जोड मिळाली आहे. हे एकूण ७ लाख चौरस फुटांपेक्षा जास्त विक्रीयोग्य क्षेत्र आहे. या प्रकल्पात सुमारे ७०० कोटी रुपयांची जीडीव्ही क्षमता आहे. मोठी मागणी असलेल्या निवासी कॉरिडॉरमध्ये मोक्याच्या ठिकाणी असलेले हे उत्पादन व्हर्टिकल लिव्हिंगमध्ये नवीन बेंचमार्क स्थापन करण्यासाठी डिझाईन केलेले आहे. या प्रकल्पामध्ये एक स्काय क्लबहाऊस असेल, त्यातून शहराची विहंगम दृश्ये, विशेष विश्रांती सुविधा आणि रहिवाशांचा अनुभव उंचावणाऱ्या सामाजिक स्पेसेस उपलब्ध होतील. त्याचे मोक्याचे स्थान, एकात्मिक डिझाईन आणि समकालीन आर्किटेक्चर यांमुळे हिंजवडीमधील एक महत्त्वपूर्ण गंतव्यस्थान म्हणून हा प्रकल्प डोळ्यांसमोर ठेवण्यात आला आहे. ॲसेट-लाईट विकास प्रारूपाच्या माध्यमातून भौगोलिक विविधता आणि भांडवल-कार्यक्षम वाढीसाठी एसपीएलची कटिबद्धता या नवीन प्रकल्पातून बळकट झाली आहे.

पुण्यातील सर्वात मोठा आयटी आणि व्यावसायिक भाग म्हणून ओळखली जाणारी हिंजवडी शहरातील सर्वात पसंतीच्या निवासी ठिकाणांपैकी एक म्हणून उदयास आली आहे. दमदार रोजगाराचे वातावरण, उत्कृष्ट दळणवळण आणि बळकट सामाजिक संरचना यांची त्यामागे चालना आहे. स्थिर भाडे उत्पन्न आणि हिंजवडी आयटी पार्क, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि जवळच असलेल्या प्रमुख शैक्षणिक आणि आरोग्य सेवा संस्था यांमुळे घरांची मागणी कायम राहिल्याने हे मायक्रो-मार्केट अंतिम वापरकर्ते आणि गुंतवणूकदार दोघांनाही आकर्षित करत आहे.

पुण्यातील आपल्या पहिल्या प्रकल्पाला मिळालेल्या उत्साहवर्धक प्रतिसादाने भारावून जाऊन या प्रकल्पाच्या माध्यमातून श्रीराम प्रॉपर्टीज पश्चिम विभागात आपले पोर्टफोलिओ आणखी मजबूत करत आहे. दक्षिण भारतातील मिड-मार्केट हाऊसिंग सेगमेंटमध्ये आपले नेतृत्व कायम ठेवतानाच पुण्यातील उच्च-वाढीच्या मायक्रो-मार्केटमध्ये आपला विस्तार करण्यावर कंपनीने लक्ष केंद्रित केले आहे. श्रीराम प्रॉपर्टीजचे उपाध्यक्ष (बिझनेस डेव्हलपमेंट) अक्षय मुरली म्हणाले, 'पुण्यातील भरभराटीला आलेल्या आयटी आणि औद्योगिक वातावरणामुळे येथे भरपूर मागणी आहे. आमच्या दुसऱ्या प्रकल्पाचा करार करणे हा आमच्या विस्ताराच्या धोरणातील एक महत्त्वाचे पाऊल आहे. या शहराच्या दीर्घकालीन क्षमतेवरील आमचा विश्वास त्यातून प्रतिबिंबित होतो. पुण्यात आमची उपस्थिती मजबूत करताना आम्हाला आनंद होत आहे. परवडणारी, उच्च गुणवत्तेची घरे पुरविण्यावर लक्ष केंद्रित करतानाच भागीदारी आणि विकास सहयोगाच्या माध्यमातून प्रमुख निवासी बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती वाढवण्याच्या श्रीराम प्रॉपर्टीजच्या व्यापक वाढीच्या धोरणाशी हा नवीनतम प्रकल्प सुसंगत आहे.



## नागरीकांकरीता बसविले आरामदायी बाक

**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक जाणिवेतून खेड तालुक्यातील विविध शासकीय कार्यालये व सार्वजनिक ठिकाणी नागरीकांना बसण्याकरीता समाजसेवक अमर बोऱ्हाडे यांनी स्वखर्चातून आरामदायी सिमेंट बाक बसविले आहेत. देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण झाल्याच्या निमित्ताने त्यांनी ७५ सिमेंट बाक नागरीकांना बसण्याकरीता देण्याचा संकल्प सोडला होता. तो या दिवाळी सणामध्ये त्यांनी पुर्ण झाल्याचे सांगितले. राजगुरुनगर एसटी बसस्थानक, खेड पंचायत समिती कार्यालय, खेड तहसीलदार कार्यालय, प्रांताधिकारी कार्यालय, महावितरण कार्यालय, नागरी सुविधा केंद्र, पत्रकार संघ कार्यालय आदी विविध ठिकाणी त्यांनी नागरिकांसाठी हे बाक बसविले आहेत. तसेच राजगुरुनगर येथील या बाकांवर हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या स्मरणार्थ समर्पित तर ऐतिहासिकदृष्ट्या महत्व असलेल्या वाफगाव येथील सिमेंट बाकावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मरणार्थ समर्पित असे लिहून हे बाक त्यांनी लोकार्पण केले आहेत. विशेष म्हणजे या कामासाठी त्यांनी कोणताही राजकीय अथवा सामाजिक निधी न मिळवता वैयक्तिक स्वखर्चातून हे काम केले आहे.

# महायुती सत्ताधारी आ. जगताप यांचा जैन मंदिर ट्रस्टचा भूखंड हडप करण्याचा डाव

**महेश वरवटे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील जैन हॉस्टेल भूखंड प्रकरणातून उडालेला धुरळा खाली बसत नाही तोच सत्ताधारी महायुतीच्या आमदाराचा आणखी एक नवीन प्रताप समोर आला आहे. अहिल्यानगर शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहर प्रमुख किरण काळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अहिल्यानगर विधानसभेच्या आ. संग्राम जगताप यांच्यावर नगर मधील जैन समाजाच्या असणाऱ्या श्री ऋषभ संभव जिन जैन श्वेतांबर संघ (जैन मंदिर) ट्रस्टचा मोक्याच्या जागी असणाऱ्या पाच हजार स्क्वेअर फूटच्या भूखंडावर बेकायदेशीर रित्यात




ताबेमारी करत धर्म कार्यासाठीचा भूखंड हडपल्याचा, गंभीर आरोप काळे यांनी केला आहे. या जागेत अनेक गुन्हेगारांची ऊठबस होत असल्याचा देखील आरोप त्यांनी केला आहे.

पुण्याच्या पत्रकार भवन मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत काळे माध्यमांशी बोलत होते. यावेळी काळेंनी सत्ताधारी महायुतीवर अनेक गंभीर आरोप केले. मृत्यपत्र, सिटी सर्व्हे उतारा, जागेचा नकाशा, भूखंड विक्री जाहीर नोटीस, आ. जगताप यांच्या राजकीय कार्यालय थाटत केलेल्या ताबेमारीचे फोटो, व्हिडिओ हे पुरावेच प्रसारमाध्यमांना दाखवत या प्रकरणाचा काळे यांनी भांडाफोड केला. जगताप हे अहिल्यानगरचे धनंजय मुंडे आहेत. त्यांनी नगरमध्ये अनेक वाल्मीक कराड जन्माला घातले असून संघटित गुन्हेगारीचे रॅकेट ते चालवत असल्याचा काळेंनी गंभीर आरोप केला आहे. मला कोणतीही किंमत मोजावी लागली तरीही ही जागा मी वाचवणारच असा प्रण यावेळी त्यांनी व्यक्त केला. काळे म्हणाले, या जागेचा पूर्वी जैन साधू, साध्वींच्या विश्राम, प्रवचनासाठी उपयोग केला जायचा. मात्र राष्ट्रवादीचे अचानक प्रखर हिंदुत्ववादी झालेले आ. जगताप यांनी जैन मंदिर ट्रस्टची ही जागा हडप केली आहे. दहशत करून त्यावर ताबेमारी केली आहे. काही ट्रस्टींनी वैयक्तिक आर्थिक लाभातून संगनमत केले. जाहीर पेपर नोटीस काढून भूखंड विक्रीसाठी टेंडर प्रक्रिया राबविली गेली आहे.

काळे म्हणाले, अहिल्यानगर येथील स्टेशन रोड वरील हुंडेकरी चाळ या नावाने ओळखली जाणारी ही मिळकत आहे. सि.स.नं. फायनल प्लॉट नंबर ११९ असून सुमारे ५००० स्क्वे. फु. हा भूखंड आहे.

श्रीमती मंगुबाई हिरालाल व्होरा यांनी वयाच्या सतराव्या वर्षी २१ जानेवारी १९७५ ला आपले मृत्युपत्र केले होते. बक्षीस म्हणून ही जागा त्यांनी जैन मंदिर ट्रस्टला दान केली होती. १८/०६/१९८७ रोजी गाव नमुना नंबर ६ ड चा फे. नंबर २६२० अन्वये जैन मंदिर ट्रस्टचे नाव उताऱ्यावर लागले आहे. निर्विवादित असणाऱ्या या भूखंडाच्या सातबारावर आजही ट्रस्टचेच नाव आहे.

देणगीदाराने अटी, शर्ती घातल्या होत्या. त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, "कधीही कोणास विकू नये. अगर दुसऱ्या कोणासही कोणत्याही प्रकारे देऊ नये.

तिचा उपयोग फक्त धार्मिक कृत्या करिताच करावा". त्यामुळे या गैरव्यवहारात सहभागी असणाऱ्या ट्रस्टीना देखील जागा विक्रीची प्रक्रिया राबवण्याचा, प्रत्यक्ष विक्री करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही.